# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०६/०७/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### दुखापत

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील आठवडी बाजार काटोल येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे २०.३० वा. ते २०.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– नितीन विजय रोंगे, वय ३३ वर्ष, रा. गळपुरा काटोल हे आठवडी बाजार काटोल येथे भाजीपाला घेणेकरीता गेले असता भाजीपाला घेवुन मोटरसायकलने खर्रा घेण्याकरीता मुस्कानच्या पाणठेल्यावर जात असता फिर्यादीच्या मोटरसायकला धक्का आरोपी नामे– प्रकाश मोरोलिया, रा. पंचवटी काटोल याला लागला असता त्याने फिर्यादीसोबत वादविवाद करून शिवीगाळ करून लाकडी दांडयाने डोक्याचे डावे भागाला कानाचे वर मारून व उजवे पायाचे पोटरीवर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोना भारती सुरजुसे मो.क्र. ९७६६१२७५९३ या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कळमेश्वर** – दिनांक ०४/०७/२०२२ चे ०७.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश उईके मो.क्र. ९८२३३२४८२६ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील कळमेश्वर ते सावनेर रोड ईकोपार्क जवळ डब्लुसीएल बसस्टॉप जवळ सावनेर येथे दिनांक ०५/०७/२२ चे १९.१५ ते १९.३० वा. पर्यंत **रामसुरत स्वंयवर कैथवास (मृतक), वय ६० वर्षे, रा. डब्लुसीएल सावनेर** हे व त्यांचे मित्र उमेश विश्वकर्मा वय ४३ वर्षे हे सावनेर ते कळमेश्वर एन.एच.५९७ ई रोडने पायदळ फिरत असता डब्लुसीएल बसस्टँड जवळ मागुन येणारी एम.एच–४४/बी– १०८५ क्रमांकाची हुन्डई आय १० कारचा चालक आरोपी नामे– रामकुमार शिवलखन यादव, वय ३४ वर्ष, रा. प्लॉट क्र. ३८, रेमंड कॉलनी वाघोडा ता. सावनेर याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्यांना मागुन धडक दिली. या अपघातात रामसुरत कैथवास हे गंभीर जखमी होवून त्यांचा मृत्यु झाला. तर उमेश विश्वकर्मा हे गंभीर जखमी झाले

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ.गायत्री राजेश सरोज वय ३५ वर्षे रा. १६ माईन्स क्वॉ.न.२ डब्लुसीएल सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश पाटील मो.क्र. ८८०५२५३९८२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**